पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय
## फुलंब्री जि. औरंगाबाद

# आचार्यकुल-प्रबोधिनी

## वार्षिक अहवाल

## शै. वर्ष :- २०१८-१९

प्रमुख

डॉ. सुरेश मुंढे

प्राचार्य

डॉ. एस. आर. टकले

उद्देश :-

१) संशोधनासाठी प्रेरणा मिळावी म्हणून शोधनिबंध वाचनाचे आयोजन करणे.

२) अभ्यास सहलीचे आयोजन करणे.

३) यशवतं प्राध्यापकांचा सत्कार करणे.

४) कर्मचाऱ्यांची प्रगल्भता वाढविणे.

५) परस्परांत सहकार्याची भावना वाढविणे.

महाविद्यालयात शै. वर्ष २०१८ -१९ या शैक्षणिक वर्षात आचार्यकुल प्रबोधिनीच्या वतीने खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**१) सहविचार सभा (बैठक) २७, २८व २९ जुलै २०१८**

१) दि. २७, २८व २९ जुलै २०१८ दरम्यान धर्मवीर संभाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय एन.५ सिडको औरंगाबाद येथे सहविचार सभा संपन्न झाली दि. २७ जुलै रोजी संस्थेची सैध्दांतिक भूमिका या विषयावर मा श्री शाम सुंदर नाईक यांनी आपले विचार मांडले याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे अध्यक्ष हरिभाऊ बागडे नाना हे होते.

२) दि. २८/७/२०१८ रोजी सकाळी योगा व आरोग्य या विषयावर डॉ. चारुलता रोजेकर यांनी मार्गदर्शन केले याच दिवशी उद्घाटन सत्रात प्रा. डॉ. सुभाष बेहरे व डॉ. सर्जेराव ठोंबरे संस्थेचे सचिव श्री शामसुंदर नाईक यांची उपस्थिती होती. दूपारच्या सत्रात रामतीर्थ स्मशान भूमिचे शुशोभीकरण या विषयावर श्रीकृष्ण कुलकर्णी तर उदयोन्मुख पीढीच्या रोजगार निर्मितीत शिक्षकांची भूमिका या विषयावर श्री संतोष कपूर यांनी मार्गदर्शन केले.

३) दिनांक २९/०७/२०१८ रोजी सकाळच्या सत्रात शिक्षण व्यवस्था व भविष्यातील आव्हाने तर दूपारी सत्रात शेतीसाठी पूरक व्यवसाय व कौशल्य विषयावर मा. श्री. सुरेश पाढोदकर यांचे मार्गदर्शन झाले. या सत्रात समारोपासाठी श्री सतीश देशपांडे (उच्च शिक्षण सहसंचालक) हे वक्ते तर अध्यक्ष सचिव शामसुंदर नाईक साहेब यांची उपस्थिती होती.

**२) अभ्यास सहल :-**

आचार्यकुल प्रबोधिनीच्या वतीने शै. वर्ष २०१८-१९ ची अभ्यास सहल दि. १/१२/२०१८ वार शनिवार रोजी फुलंब्री शहराजवळील पालपाटा येथील अजीत सिड्स या बियाण्याच्या संशोधन केंद्रा ठिकाणी नेण्यात आली.

या सहलीमध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कर्मचारी व प्राचार्य यांची उपस्थिती होती अजीत सिड्स चे प्रशासकीय व्यवस्थापक श्री. अंभोरे साहेबांनी अजीत सिड्स सा कंपनी बद्दल संपूर्ण माहिती सर्व कर्मचाऱ्यांना याप्रसंगी दिली व सांगितले की या सिड्स कंपनीतून राजस्तान व गुजरात या राज्यांना बियाणे निर्यात केले जाते.

या अभ्यास सहलीच्या माध्यमातून सर्व कर्मचाऱ्यांना बियाण्यांची निर्मिती कशी होते याची संपुर्ण माहिती मिळाली व एका उत्तम व्यवस्थापकामूळे कमी कालावधीत एक चांगली सुसज्ज व स्वच्छ निसर्गरम्य परीसर आसलेली व्यवस्था कशी उभी राहु शकते याचा प्रत्यक्ष अनुभव सर्वांना आला.

३) शोधनिबंध वाचन :-

१) डॉ. पांडूरंग कल्याणकर यांनी दिनांक ३१/०८/१८ शुक्रवारी दूपारी ४ वा आचार्य प्रवोधिनीच्या वतीने हिंदी विभागात पी.पी.टी च्या माध्यमातून शोधनिबंध वाचनाचे सादरीकरण केले, याप्रसंगी त्यांनी 'रेशीम शेतीचा शेतकऱ्यांच्या अर्थिक स्थितीवर झालेला परिणाम" या विषयाच्या अनुशंशाने आपले शोधनिबंध वाचनाचे सादरीकरण विविध उदा.च्या माध्यमातून केले याप्रसंगी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

२) डॉ. राजश्री पवार यांनी दिनांक ६/१०/२०१८ शनिवार दूपारी ३:३० वा. आचार्यकुलप्रवोधिनीच्या वतीने आयोजीत शोधनिबंधवाचन सत्रात संत तुकोबांच्या अभंगातील भक्ती महीमा या विषयावर व डॉ. दत्तात्र्यय येडले यांनी उपन्यास साहित्य में व्यक्त कृषक जीवन या विषयावर शोधनिबंधाचे सादरीकरण केले.

३) डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी दि. १२/१२/१८ रोजी आचार्यकुलप्रवोधिनीच्या वतीने आयोजीत शोधनिबंधवाचन सत्रात आपल्या या ग्रामीण भागातील महीला मधील कौटोंवीक हिंसा विशेष संदर्भ फुलंब्री तालूका शोधनिबंधाचे पी पी टी च्या माध्यमातून सादरीकरण केले या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

४) प्रा. विजय पांडे यांनी दि. १७/०१/१९ बार गुरुवार रोजी दूपारी ३:३० वा.आयोजित शोधनिबंध सत्रात आपल्या समग्र क्रांतीकारकतेचा अविष्कार शहीद भगतसिंग या शोधनिबंधाचे सादरीकरण केले या प्रसंगी सर्व प्राध्यापकांची उपस्थिती होती.

४) सत्कार समारंभ :-

आचार्यकुल प्रवोधिनीच्या वतीने शै. वर्ष २०१८-१९ मध्ये विशेष प्राविण्य अथवा निवड, पुरस्कार मिळालेल्या सर्व प्राध्यापकांचे स्वाग करण्यात आले, या मध्ये प्रामुख्याने

१) दि. ३१/०८/२०१८ रोजी शोधनिबंधवाचक सत्रात डॉ. मंजुषा नळगीरकर यांचे BOAS नियुक्ती बद्दल अभिनंदन करण्यात आले.

२) दि. २६/०९/२०१८ रोजी शोधनिबंध वाचन सत्रात डॉ. सजीवकुमार पांचाळ यांचे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल स्वागत (अभिनंदन) करण्यात आले.

५) पंडित दीनदयाल शिष्यवृत्ती योजना :-

शै. वर्ष २०१८-१९ पासून महाविद्यालयातील नियमीत उपस्थित राहाणाऱ्या विद्यार्थ्यासाठी आचार्यकुलप्रवोधिनीच्या वतीने पंडित दीनदयाल शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली. यामध्ये

प्रामुख्याने बी.ए.बी.कॉम, बी.एस्सी व क्रीडा, सांस्कृतीक, रा.से.यो च्या नियमीत उपस्थित राहणाऱ्या एकुण २२ विद्यार्थ्यांची निवड करुण त्यांमध्ये १० मुले व १२ मुलीना प्रत्येकी १०००व ५०० या प्रमाणे व दोन मुलांना ५०० प्रमाणे २१०००रु ची अर्थिक मदत करण्याात आली.



सहविचार सभा २७,२८,२९ जुलै २०१8



सहविचार बैठकीचे उद्घाटन सत्र




आयाधिकम प्रबोधिनी अंतर्गत अभ्यास सहल २०१७



अजीत सिड्स या बियाणे उत्पादन कंपनीला भेट देताना पुणवंत स्वामी महाविद्यालयीन कर्मचारी




शोधनिबंधाचे सादरीकरण करताना डॉ. कल्याणकर




शोधनिबंधाचे सादरीकरण करताना डॉ. राजश्री पवार




शोधनिबंध सादरीकरण करताना व्याख्याते
डा. विजय पोळे.

